सुराज्य
सोलापूर
epaper.surajyadigital.com
04 May 2022 - Page 3



# जैविक खतांचा वापर करुन द्राक्ष उत्पादन वाढवा

## डॉ.सोमकुवंर यांचे मत; विठ्ठलगंगातर्फे शेतकरी संवाद कार्यशाळा

सुराज्य/माढा

द्राक्ष पिकांच्या उत्पन्न वाढीसाठी योग्यवेळी योग्य पद्धतीने छाटणी आणि माती-परीक्षण महत्वाचे आहे. वाढत्या तापमानाचा घड निर्मितीवर होणारा दुष्परिणाम टाळतानाच रासायनिक खतांच्या वाढत्या किमती लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त जैविक खतांवरती भर द्यावा, असे आवाहन द्राक्ष संशोधन केंद्राचे संचालक डॉ.आर.जी सोमकुवंर यांनी केले.

विठ्ठलगंगा फार्मर्स प्रोड्युसर कंपनीच्या प्रक्षेत्रावर शेतकऱ्यांच्या विविध पिकावरील समस्या सोडवण्याच्या दृष्टीने शेतकरी संवाद हा उपक्रम राबविण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून १ मे रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून द्राक्ष पिकातील एप्रिल छाटणी व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने कंपनीतर्फे आयोजित शेतकरी संवाद कार्यक्रमात राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्राचे संचालक डॉ. आर.जी. सोमकुंवर बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माढा वेल्फेअर फाऊंडेशनचे अध्यक्ष तसेच कंपनीचे चेअरमन धनराज शिंदे हे होते. द्राक्षे संशोधन केंद्राचे संचालक डॉ.निशांत देशमुख सोलापूर जिल्ह्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाळासाहेब शिंदे, मंडळ कृषी अधिकारी संजय पाटील तसेच कंपनीचे व्हाईस चेअरमन श्रीकांत पाटील, संचालक पोपट खापरे, नितीन कापसे, महेश मारकड, महेश डोके, प्रशासकीय अधिकारी राहुल वरपे व सर्व कर्मचारी वृंद आणि मोठ्या संख्येने द्राक्ष उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

द्राक्ष पिकावरती होणारे नवनवीन संशोधन आणि उपलब्ध शास्त्रीय माहिती शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहाचवण्यासाठी द्राक्ष संशोधन केंद्र नेहमीच प्रयत्नशील असते. उत्पादनातील सूर्यप्रकाशाचे महत्व या विषयावरती मार्गदर्शन करताना संचालक डॉ.निशांत देशमुख म्हणाले, द्राक्ष वेलींना मुबलक सूर्यप्रकाश मिळाल्यास जास्त प्रमाणात प्रकाश संश्लेषण क्रिया घडून येते पर्यायी कार्बो हायड्रेटचे संचयन होऊन उत्पादनात भरघोस वाढ होते. याकरिता वेलींचे कॅनॉपी व्यवस्थापन करणे उत्पादन वाढीच्या दृष्टीने फायदेशीर असल्याचे त्यांनी सांगितले.

माढा वेल्फेअर फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तसेच कंपनीचे चेअरमन धनराज शिंदे यांनी भविष्यात शेतकर्यांनी निर्यातक्षम शेतीमाल उत्पादना-वरती भर देणे आवश्यक असून कंपनीद्वारे उभारण्यात आलेल्या अद्ययावत पॅकहाऊसचा फायदा करुन घेण्याचे आवाहन त्यांनी उपस्थिताना केले. शेतकरी बांधवांचे आभार नितीन बापू कापसे यांनी मानले.